# बॉटल नेक मर्डर

लेखक

**जेम्स हॅडली चेस**

स्वैर अनुवाद

**मधुकर हुद्दार**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B 281

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**बॉटल नेक मर्डर : मधुकर हुद्दार**
© **सुरक्षित**
**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
डिसेंबर, २०१३

**किंमत**
₹ १९०/-

# बॉटल नेक मर्डर

# प्रकरण १

फ्रॅन्क मॉर्गन हा एक अट्टल गुन्हेगार होता. गुन्हेगारीच्या विश्वात त्याचा चांगलाच दबदबा होता. विशेष म्हणजे, तो एक बुद्धिमान, कल्पक नि धाडशी गुन्हेगार म्हणून कुख्यात होता. 'पैसा' हा एक दोन अक्षरी बीजमंत्र, तो नेहमी जपत असे. पैशानं सारं जग खिशात घालता येतं, असा त्याचा अनुभव होता.

समाजातील सर्वसामान्य माणसांप्रमाणे रूळलेल्या नैतिक मार्गानं, दरमहा ठराविक पैसा कमावणं, किंवा व्यापार करून, श्रीमंत होण्याची कल्पना, त्याच्या स्वभावाच्या चौकटीत बसणारी नव्हती. चांदीचा चमचा तोंडात घेऊन जन्माला येणारे लोक भाग्यवान असतात, हे त्याला ठाऊक होतं; परंतु हे भाग्य सर्वांना लाभत नाही, याचीही त्याला जाणीव होती. शिवाय सरळ मार्गानं जाणं किंवा मार्गानं सरळ जाणं, हे मॉर्गनला जमणं शक्यच नव्हतं!

यासाठी त्यानं लूटमार व दरोडेखोरीचा मार्ग अवलंबिला होता. पैसा संपला की, संधी शोधत, कुत्र्याप्रमाणं हुंगत फिरत राहणं, हा त्याचा स्वभाव होता. शहरातील सर्व बँका, श्रीमंतांचे बंगले, कॅसिनो, जुगाराचे अड्डे, करेटींनी पैसा कुठून कुठे व कसा जातो, याची इत्थंभूत बातमी माहिती त्याच्या डोक्यात संगणकासारखी साठवलेली असे. या आधारेच मॉर्गन आपल्या योजना आखीत राही.

आज त्याच्या डोक्यात अशीच एक फुलप्रूफ योजना शिजत होती. त्यासाठीच फ्रॅन्कनं, आपल्या विश्वातल्या तीन हरहुन्नरी सहकाऱ्यांना एका गुप्त जागी बोलावलं होतं.

मॉर्गन एका खोलीत, मधोमध ठेवलेल्या टेबलापाशी बसलेला होता. त्याच्या उजव्या हाताला गायपो मेंडिनी व एड ब्लेक, अन् डाव्या हाताला ॲलेक्स किटसन स्थानापन्न झाले होते.

समोरील टेबलावर मंद हिरवा प्रकाश पसरला होता. खोलीच्या अन्य भागात मात्र अंधुक प्रकाश होता. स्वाभाविकच होतं! कारण चोरांना प्रकाशाचं भय! अंधाराशीच त्यांचं सख्य.

सारेच सिगारेट पीत असल्यामुळे, धुराचे लोट छताकडे वळून, एकूण वातावरण धूसर झालं होतं. टेबलावरील ॲश ट्रे सिगारेटच्या थोटकांनी भरला होता. प्रत्येकाच्या हातात काचेचा ग्लास होता. व्हिस्कीनं ग्लासचा तळ गाठला, तर बाटलीतील व्हिस्की त्यात ओतली जाई.

धूम्रपान व मद्यपान होत असतानाच पत्त्यांची पानं पिसून वाटली जात होती. बराच वेळ पत्त्यांचा खेळ सुरू होता, पण मॉर्गनचा अपवाद वगळता, इतर तिघांना निदान आज तरी, पत्त्यांच्या खेळात रस नव्हता. मॉर्गनच्या हे लक्षात आलं होतं.

त्याच्या हाती सर्व राजे होते, अन् इतरांकडे एक एक गुलाम, सध्यातरी ते मॉर्गनचे गुलामच होते!

फ्रॅन्कनं आपल्याला इथं कशासाठी बोलावलं? त्याच्या मनात काही शिजतंय का? असे अनेक प्रश्न त्याच्या मनात पिंगा घालीत होते. पण फ्रॅन्कला हे कुणी विचारायचं? हाच खरा प्रश्न होता.

मॉर्गन प्रत्येकाच्या चेहऱ्यावरील भावांचं निरीक्षण करीत होता. शेवटी त्यानंच हातातील पत्ते टेबलावर तिरकस भिरकावले अन् एक लांब धुराचा लोट तिघांच्या डोक्यावर सोडला. इतरांनीही आपापले पत्ते पुढ्यात टाकले. तिघेही मॉर्गनकडे पाहू लागले.

फ्रॅन्क मॉर्गन वयानं सर्वात मोठा व बलदंड शरीराचा होता. त्याचा चेहरा कठोर व डोळे सापासारखे भेदक असे काळेभोर होते. ओठ पातळ असल्यामुळे त्याने तोंड मिटलं की ओठांची एक सरळ रेषा तयार होई. त्याच्या बारीक काळ्याशार डोळ्यांतून बाहेर पडणारी नजर, धारदार हत्यारापेक्षाही घातक होती.

मॉर्गननं पत्ते खाली टाकल्यावर, दोन्ही हाताच्या बोटांनी टेबलावर ठेका धरल्यासारखा आवाज काढायला सुरूवात केली. उरलेले तिघे एकमेकांकडे पाहू लागले. वातावरण शांत व गंभीर झालं होतं. मॉर्गननं गायपोकडे पाहिलं.

गायपो मेंडिनी हा थुलथुलीत व भला लठ्ठ होता. त्याचा चेहराही टरबुजासारखा गोल होता. केस कुरळे व कानाशी पांढरे झालेले. त्याचं नाक पातळसर व रंग सावळा होता. मॉर्गननं ब्लेककडे नजर वळवली.

ब्लेक उंच, सुदृढ अंगकाठीचा होता. रंग गोरापान रूप देखणं, ही त्याची जमेची बाजू होती. त्याचं व्यक्तिमत्त्व इतकं आकर्षक होतं की, कुणीही त्याच्याकडे आकर्षित व्हावं. ब्लेकनं या वेळी राखाडी रंगाचा सूट घातलेला होता. आतील शर्टाला शोभेल असा नेकटाय व बूट त्यानं घातले होते. त्याच्या मर्दानी सौंदर्याला शोभेल असाच त्याचा पोषाख होता. मॉर्गननं ॲलेक्स किटसनकडे पाहिलं.

किटसन या चौघांत वयानं सर्वांत लहान होता. तो तेवीस वर्षांचा होता. त्याचं शरीर कमावलेलं पण उन्हात रापलेलं होतं. चौकट चेहरा व चपटं नाक यामुळे तो धंदेवाईक मुष्टियोद्धाप्रमाणे दिसत होता. त्यानं काळी पॅन्ट नि बिना कॉलरची जर्सी असा पोशाख केला होता.

मॉर्गनच्या धारदार नजरेनं तिघांनाही न्याहाळलं, पोकर चिप्स गोळा करून नीट रचून ठेवल्या अन् पुन्हा बोटांनी टेबलावर टक-टक-टक असा आवाज काढायला सुरूवात केली. आता मात्र तिघांचाही संयम संपला होता.

''फ्रॅन्क, सायंकाळपासूनच तू अस्वस्थ दिसतोयस. तुझ्या मनाला एवढं अस्वस्थ करणारं कारण तरी काय आहे? काहीतरी टोचतंय-बोचतंय तुझ्या मनाला. होय ना?'' ब्लेक अनावर होऊन म्हणाला.

मॉर्गन तरीही टेबलावर बोटांनी टक टक असा आवाज काढीतच राहिला. नंतर एकाएकी ताडकन उभा राहून त्यानं आपले दोन्ही हात टेबलावर टेकवले अन् समोर वाकून म्हणाला,

''तुम्हाला दोन लाख डॉलर हवे आहेत? बोलाऽऽ''

हे ऐकताच तिघेही ताठरल्यासारखे पुतळा होऊन बसले. त्यांना ठाऊक होतं की, मॉर्गनला खात्री असल्याशिवाय, तो केवळ गंमत म्हणून काही बोलणार नाही; त्याच्या योजकतेवर तिघांचाही विश्वास होता.

दोन लाखाचा आकडा ऐकून त्यांना आकडी बसल्यासारखेच झाले. चमकलेच ते.

''दोन लाख डॉलर प्रत्येकी,'' मॉर्गन पाकिटातून सिगारेट काढून म्हणाला, ''पण हे काम सोपं नाही. जोखमीचं आहे.'' ब्लेकनंही सिगारेटचा धूर वर सोडीत म्हटलं,

''म्हणजे आपण आठ लाख डॉलरवर हात मारणार, असंच ना?''

''दोन लाख प्रत्येकी, कारण याचे पाच भाग होणार,''मॉर्गन म्हणाला,

''कारण यातील पाचवा हिस्साही महत्त्वाचा आहे. एकूण रक्कम एक मिलियन आहे, तेव्हा विचार करा. दहा डॉलरची नोटच तुम्हाला मोठ्ठी वाटते. मग एवढ्या नोटा खिशात कोंबल्यावर तर, सारं जग खिशात घातल्यासारखं तुम्हाला वाटेल.''

''एकदा पुन्हा सांग बघू. माझा तर विश्वासच बसत नाही.'' गायपोनं थोडे पुढे झुकून विचारलं.

''आता नीट ऐक. दोन लाख डॉलर प्रत्येकी. कळलं?'' मॉर्गन प्रत्येक शब्दावर जोर देत व पायगोवर खेकसत म्हणाला, ''पण काम कठीण आहे हे लक्षात ठेवा सारे.''

''फ्रॅन्क, तू पाचव्या हिश्श्याचं म्हणतोस, पण हा पाचवा कोण?'' ब्लेक चिडून म्हणाला.

''मी त्याबद्दल सांगेनच'' मॉर्गन म्हणाला. त्यानं आपली खुर्ची मागे ढकलली अन् तो उभा राहिला. समोर वाहून त्यानं दोन्ही हात, टेबलावर अंतर ठेवून पंजा पसरून ठेवले. त्याचा चेहरा कठोर झाला. त्याच्या चेहऱ्यावरील उग्रता व ताण पाहणाऱ्यांना जाणवत होता. हा काय बोलणार याकडे तिघांचे कान टवकारले होते.

''एक मिलियन डॉलर आपल्याला ताब्यात घ्यायचे आहेत.'' कुटिल हास्य करीत मॉर्गन म्हणाला.

''अच्छाऽऽ आता आलं लक्षात,'' ब्लेक म्हणाला, ''तू रॉकेट रिसर्च स्टेशनकडे नेल्या जाणाऱ्या दौलतीबद्दल बोलतायेस'' ब्लेकनं आपला अंदाज व्यक्त केला.

''ब्लेक, तुझा तर्क अगदी बरोबर आहे. तू खरंच स्मार्ट आहेस'' मॉर्गन म्हणाला. मॉर्गननं किटसनकडे पाहिलं, कारण तो आपल्याकडे आश्चर्यानं बघतोय हे मॉर्गनच्या लक्षात आलं होतं.

''ऐकलंस ना किटसन, आपलं पुढील सावज हेच असणार. अर्थात रॉकेट रिसर्च स्टेशनकडे जाणारी कॅश. एक मिलियन डॉलर'' मॉर्गननं किटसनकडे पाहून हसत म्हटलं. किटसनला ही कल्पना अशक्य कोटीतली वाटल्यामुळे तो चिडला.

''फ्रॅन्क, अरे वेड्यासारखा काय बोलतोस. असलं काम होणं शक्य नाही. हा शुद्ध मूर्खपणा आहे'' आपल्या मुठी आवळत किटसन म्हणाला. किटसनचं मत ऐकून मॉर्गन हसला, अगदी लहान मुलाकडे पाहून, त्याचं निर्बुद्ध बोलणं ऐकल्यावर मोठ्या माणसानं हसावं, तसा.

फ्रॅन्कनं ब्लेककडे पाहिलं. ब्लेक हुशार होता. किटसन मुष्टियुद्धात प्रवीण होता. शिवाय तो कोणतीही कार चालविण्यात निष्णात होता. पण कुठलीही गोष्ट त्याच्या मेंदूत लवकर शिरत नसे.

''एड, तुला काय वाटतं या योजनेबद्दल?' मॉर्गन म्हणला.

''याबद्दल विचार करूनच उत्तर द्यावं लागेल'' ब्लेक सिगारेट पेटवित म्हणाला.

''तू बोल मी ऐकतोय'' मॉर्गन.

ब्लेकचं हे वैशिष्ट्य होतं की, जोपर्यंत कुठल्याही महत्त्वपूर्ण कामाची शहानिशा होत नाही, त्याचा सर्वांगीण विचार केला जात नाही, तोपर्यंत आपलं कुठलंही मत बोलून दाखवायचं नाही. त्यामुळे ब्लेकनीच मॉर्गनला प्रश्न विचारला,

''तू हे काम कठीण व जोखमीचं आहे म्हणतोस, मग सांग यात कठीण ते काय आहे?''

मॉर्गनने किटसनकडे पाहिलं अन् त्याला म्हणाला,

''किटसन, तूच सांग. कारण तू या पूर्वी त्या कंपनीत काम केलंय. तुला अंतर्बाह्य माहिती असेलच. तुझं विवरण ऐकणं जास्त मोलाचं ठरेल.''

''मला चांगल्याप्रकारे ठाऊक आहे की, हे काम केवळ कठीण नव्हे तर अशक्यप्राय आहे. एखादा कवटी सरकलेला माथेफिरूच अशी योजना आखू शकेल. या ट्रकमधून पे रोल म्हणजे कर्मचाऱ्यांच्या वेतनाची व अन्य आवश्यक विभागांचं पेमेन्ट करण्यासाठी रक्कम नेली जाते. ही रक्कम लुटणं, म्हणजे स्वत:वर संकट ओढवून घेण्यासारखं ठरेल.'' किटसननं तिघांकडे एक दृष्टिक्षेप टाकला अन् त्याला या क्षणी असं वाटलं की, आपल्यापेक्षा वयानं नि अनुभवानं मोठ्या सहकाऱ्यांसमोर जास्त काय सांगावं, तरीही तो पुढं बोलू लागला.

''मी गंमत करत नाही. पण या वेलिंग ट्रक एजन्सीनं हा नवा ट्रक एक आव्हान म्हणून तयार केला असून या ट्रकला कुणीही फोडू शकणार नाही, असा त्यांचा दावा आहे. पूर्वी ट्रकच्या सुरक्षिततेसाठी बाहेर गार्डस राहात असत. रकमेचा विमासुद्धा काढा जाई.

आता ही नवीन ट्रक स्वयंपूर्ण आहे. ती फुलप्रूफ असून आतील रकमेचा विमाही काढला जात नाही. मी कंपनी सोडण्यापूर्वीच हा ट्रक तयार करण्यात आला होता.''

हे ऐकून गायपेनं हाताच्या तळव्यांनी आपला चेहरा पुसला. त्याला घाम सुटला होता. मॉर्गनकडे त्यानं रागानं पाहिलं नि म्हणाला,

''फ्रॅन्क, याबद्दल तुझाही काही दृष्टिकोन असेल ना?'' पण मॉर्गननं त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही. किटसनकडे एकाग्रतेनं पाहात म्हणाला,

''तू बोलत राहा. सांग सर्वांना की, हा ट्रक लुटणं कठीण का आहे.''

किटसननं एक पोकर चीप हाताच्या बोटात फिरवत ठेवली. नंतर आपल्या दाट केसातून हाताची बोटं फिरवीत क्षणभर भूतकाळातील काही घटनांचा विचार केला. गेल्या सहा महिन्यात या चौघांनी पाच-सहा योजना तडीस नेऊन, थोडा पैसा कमावला होता. या योजना मॉर्गनच्या कल्पक डोक्यातून जन्माला आल्या होत्या व त्यात कुठलाही धोका नव्हता. पण ही रिसर्च सेंटरची योजना त्याला मूर्खपणाची वाटत होती. मॉर्गनच्या नेतृत्वावर विश्वास असूनही या वेळी त्याला हा जॉब मूर्खपणाचा वाटत होता. याचं कारण सर्वांना सांगणं आवश्यक होतं म्हणून मॉर्गनच्या संकेतानुसार किटसन बोलू लागला.

''मी कंपनी सोडण्यापूर्वीच एक नवीन ट्रक ज्याबद्दल मघा मी बोललो, कंपनीत आला. याची विशेष रचना मनाला थक्क करणारी आहे. हा ट्रक एक अभेद्य अशा विशेष धातुच्या आवरणाखाली मजबूत स्टीलच्या चादरींची जोड देऊन तयार केलेला आहे.

वरील संरक्षक कवच व ही स्टीलची बॉडी, कुठल्याही पद्धतीनं कापली जाऊ शकत नाही. हे शक्य आहे की, अत्याधिक उष्णतेवर हे स्टील वितळू शकेल; परंतु आत्यंतिक उष्णतेचा हा दबाव, तास न् तास व काही दिवस नव्हे तर काही आठवडे सतत क्रियाशील ठेवता आला, तरच हे शक्य आहे.

या ट्रकचा दरवाजा हा अत्यंत मजबूत बनविण्यात आला आहे. यावर एक टाईम लॉक लावलेला आहे. ट्रकमध्ये पैशाचे लोडिंग झाले. म्हणजे थैल्या किंवा बॅगा अथवा आतील तिजोरी डॉलरनं भरण्यात आली की, हे लॉक दारावर बसविले जाते. अत्यंत वेगाने ट्रक चालविल्यास तीन तास रिसर्च स्टेशनला पोचायला